MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@mercindia.org.in वेबसाईट: www.mercindia.org.in

## जाहीर सूचना

**आयोगाचे सन २०१२ चे प्रकरण क्र.६३**

दि. ६ जुलै, २०१२ जाहिरात क्र.५/२०१२-१३

## इंधन समायोजन खर्चाची कमाल मर्यादा वाढविण्याबाबत प्रस्ताव

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ च्या विनियम ८२ अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील वितरण परवानाधारकांनी आकारावयाच्या इंधन समायोजन खर्चाची (एफ ए सी) सुधारित कमाल मर्यादा ठरविण्यासाठी आयोगाने स्वतःहून तयार केलेल्या प्रारुप आदेशावर सुनावणी**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ च्या विनियम ८२.६ नुसार, महाराष्ट्र राज्यातील वितरण परवानाधारकांनी आकारावयाच्या इंधन समायोजन खर्चाची (एफ ए सी) सुधारित कमाल मर्यादा ठरविण्यासाठी आयोगाने स्वतःहून प्रारुप आदेश तयार केला आहे. हा आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या रुपात उपलब्ध आहे.

२. याद्वारे आयोग प्रारुप आदेशावर जनतेकडून सूचना व हरकती मागवित आहे. सदर सूचना व हरकती, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४०० ००५. (फॅक्स : ०२२ – २२१६३९७६; ई-मेल : mercindia@mercindia.org.in) यांना **शुक्रवार, दि. ३ ऑगस्ट, २०१२** पर्यंत पाठवाव्यात.

३. सुधारित इंधन समायोजन खर्चावरील कमाल मर्यादेचा परिणाम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण कंपनी), रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आर-इन्फ्रा), बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) आणि दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टीपीसी) या महाराष्ट्र राज्यातील सर्व वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांवर होणार आहे. त्यामुळे, या सर्व वितरण परवानाधारकांच्या कार्यक्षेत्रातील इच्छुक ग्राहक आणि हितसंबंधितांनी सूचना व हरकती आयोगास, खाली नमूद केलेल्या रीतीने व मुदतीत पाठवाव्यात ज्यामुळे आयोगाला या प्रकरणी विचारपूर्वक निर्णय घेणे शक्य होईल.

४. ज्या व्यक्तीस सूचना व हरकती पाठवावयाच्या असतील अशा व्यक्तीने त्या इंग्रजी आणि मराठीत, सहा प्रतींमध्ये, संपूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता व, असल्यास, ई-मेलच्या पत्त्यासह पाठवाव्यात. सूचना व हरकती जर ग्राहक वर्गवारीच्या कोणत्याही संघटनेच्या वतीने दाखल करण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. हितसंबंधितांना त्यांचे म्हणणे आयोगासमोर मांडण्याची संधी, **सेंट्रल हॉल, पहिला मजला, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्र. १, कफ परेड, मुंबई – ४०० ००५, येथे सोमवार, दिनांक ३० जुलै, २०१२ रोजी १६.०० वाजता** होणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी देण्यात येईल. त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही. दि. ३ ऑगस्ट, २०१२ पर्यंत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना आणि हरकती विचारात घेण्यात येतील.

५. त्याशिवाय, **महावितरण कंपनीचे इच्छुक ग्राहक आणि हितसंबंधित देखील, त्यांच्या सूचना व हरकती,** महावितरण कंपनीच्या आर्थिक वर्ष २०१०-११ चे अंतिम समायोजन, आर्थिक वर्ष २०११-१२ आणि २०१२-१३ ची एकूण महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या वीज दराचे निश्चितीकरण आणि सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ मधील आकाराच्या अनुसूचीत सुधारणा करण्यासाठीच्या याचिकेबाबत खालील ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या **जाहीर सुनावणीच्या वेळी देखील सादर करू शकतील.**

| अ.क्र. | जाहीर सुनावणीची जागा/ठिकाण | वेळ | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | **अमरावती**<br>हॉल क्र.१, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कॅम्प परिसर, अमरावती, जिल्हा – अमरावती | १०.०० वाजता | बुधवार, ११ जुलै, २०१२ |
| २. | **नागपूर**<br>वानामती हॉल, व्ही.आय.पी. मार्ग, धरम पेठ, नागपूर, जिल्हा – नागपूर | १०.०० वाजता | शुक्रवार, १३ जुलै, २०१२ |
| ३. | **औरंगाबाद**<br>मिटींग हॉल, विभागीय, आयुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा – औरंगाबाद | १०.०० वाजता | गुरूवार, १९ जुलै, २०१२ |
| ४. | **नाशिक**<br>नियोजन भवन, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जुना आग्रा मार्ग, नाशिक | १०.०० वाजता | सोमवार, २३ जुलै, २०१२ |
| ५. | **पुणे**<br>कौन्सिल हॉल, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, पुणे, जिल्हा – पुणे | १०.०० वाजता | बुधवार, २५ जुलै, २०१२ |
| ६. | **नवी मुंबई**<br>आग्री कोळी भवन, सेक्टर २४, नेरूळ, नवी मुंबई | १०.०० वाजता | शुक्रवार, २७ जुलै, २०१२ |

**निबंधक, मविनिआ**